**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न विधी महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

**राज्यातील सर्व विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता सन २०१७-१८ पासून प्रति तुकडी ६० विद्यार्थी अशी** केल्याबाबत महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी शासन निर्णय क्रमांक:विधी-२०१६/प्र.क्र.२४१/मशि-२, दि.१७ मे, २०१७ अन्वये कळविले आहे. सदर शासन निर्णयाची नोंद घेऊन संलग्नीत विधी महाविद्यालयातील तीन व पाच वर्षे अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेमध्ये बदल करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली आहे. सबब, सदरचा शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केला आहे.

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ No 111 --
दि.: 26 SEP 2017

प्रत - १.संलग्नता टी-१ विभाग, २.पात्रता विभाग, ३.अभ्यास मंडळे विभाग, ४.इतर परीक्षा विभाग-१
५. सांख्यिकी कक्ष

राज्यातील सर्व विधी अभ्यासक्रमांसाठी प्रति तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमता निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः विधी-२०१६/प्र.क्र.२८१/मशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १७ मे, २०१७.

वाचा:- उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बैठक १०९६/विधी महा (५३९/९६)/मशि-३, दि.२८.०४.१९९७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अंतर्गत ३/५ वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यानुसार सन २०१६-१७ साठी सदर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या मार्फत सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेने राबविण्यात आली आहे. सदर प्रवेश प्रक्रिया राबविताना विधी महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेची नोंदणी करताना, काही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ८० विद्यार्थी प्रति तुकडी, तर काही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी प्रति तुकडी अशी नोंदविण्यात आली होती. सदर प्रवेश क्षमतेच्या तफावतीमुळे सन २०१६-१७ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचणी निर्माण झाल्याने, यापुढे विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रति तुकडी विद्यार्थी प्रवेश क्षमतेमध्ये एकसमानता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सदंर्भाधीन दिनांक २८.०४.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील "विधी महाविद्यालयाच्या प्रत्येक तुकडीत जास्तीत जास्त ८० विद्यार्थी असावेत" ही तरतुद या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पासून, राज्यातील सर्व विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रति तुकडी ६० विद्यार्थी अशी राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५१७१५५४३४१५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Rohini Bhalekar
Date: 2017.05.17 16:51:24 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. अध्यक्ष, लिगल एज्युकेशन समिती, बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली.
२. कुलगुरु, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिर्व्हसिटी, मुंबई, नागपूर,
३. उपाध्यक्ष, स्टेट बार कौन्सिल ऑफ इंडिया, महाराष्ट्र, मुंबई.

४. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
७. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत).
८. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई.
९. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित विधी महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत).
१०. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
११. मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती/मशि-२.